## प्रकरण पहिले

# मराठी कथा

# आणि

# रंगराव बापूंचा परिचय

## प्रस्तावना

मराठी साहित्याला खूप मोठी परंपरा असल्याचे आपणांस दिसून येते. १८१८ ला पेशवाई बुडाली. पेशवाईची पर्यायाने मराठी राजवटीची अखेर झाली. ब्रिटीश राजवटीला प्रारंभ झाला. चिपळूणकरांच्या निबंधमालेली सुरवात झाली, तो कालखंड १९७४ चा होता. निबंधमालेत एकदंरीत वाङ्मय आणि भाषा यांच्या विचारात विशेष चालना दिली असली तरी नवीन काव्य, अथवा कथा वाङ्मय किंवा नाटय वाङ्मय यांना ती प्रत्यक्षपणे कारणीभूत झाली असे म्हणता येत नाही.

मराठीतील ललित वाङ्मयाला १८८० ते १८९० या दशकामध्येच प्रारंभ झाला. या कालखंडामध्ये अनेक कथा, कादंबऱ्याची भाषातंरे झालेली दिसून येतात. प्रस्तुत कालखंडास 'भाषांतर युग' असे संबोधले जाते. कारण यातील बरेच वाङ्मय भाषांतरीत स्वरूपाचे आहे. सुरवातीला काही शालेय वाङ्मय निर्माण झाले. ते भाषांरीत स्वरुपाचे होते. ललित नसणाऱ्या वाङ्मयाप्रमाणे ललित कथात्मक वाङ्मयही आले. इंग्रजीवरून भाषांतर करण्यावर भर असला तरी संस्कृत आणि फारसी वाङ्मयावरूनही भाषांतरे झाली. या कालखंडामध्ये इंग्रजीतून कथा नाटके व काव्य यांची भाषांतरे आली. या कालखंडामध्ये इंग्रजीतून कथा नाटके व काव्य यांची भाषांतरे अर्थातच होत होती. वाङ्मयीन युगास 'भाषांतर युग' म्हटले गेल्यास ते स्वाभाविकच होते. नियतकालीकांचा उदय हे या कालखंडाचे वैशिष्टय आहे. या काळातील मराठी गद्याचा बराचसा सविस्तर परामर्श प्रथम घेणारे महामहोपाध्याय द. वा. पोतदार आपल्या ग्रंथाचा उपोद्घातच म्हणतात

"परंतु सामग्रयाने जेव्हा या काळातील मराठी ग्रंथ व ग्रंथकार आमच्या पुढे उभे राहतात, तेव्हा आम्हांस प्राजंळपणाने असे कबूल करणे भाग पडते की, या पाऊणशे वर्षांत एकही अलौकिक किंवा अजरामर ग्रंथ मराठीत झाला नाही. लहानसहान सटरफटर ग्रंथ भराभर झाले. 'तारांगण' पुष्कळच उगवला, पण तमोनाशक चंद्र मात्र कोठेच आढळला नाही.! " [१]

या पार्श्वभूमीवर विचार करताना कथेची सुरुवात व तिची परंपरा पाहणे आवश्यक आहे. भारत हा प्रामुख्याने कथाप्रिय देश असल्याचे आपणांस दिसते. भारतीय कथा वाङ्मयाला फार प्राचीन परंपरा आहे. हा वाङ्मयप्रकार समृद्ध व अतिशय लोकप्रिय असा दिसून येतो. गोष्ट सांगण्याची व गोष्ट ऐकण्याची सवय फार प्राचीन काळापासून मराठी माणसाला आहे. म्हणून तर मराठी माणूस हा कथाप्रिय आहे असे म्हटले जाते.

## कथेची परंपरा

बालपणापासून कथा आपणास साथ देत असते. लहाणपणी आईने सांगितलेल्या काऊचिऊच्या गोष्टी आपल्याला आवडतात. नंतरच्या आजीने सांगितलेल्या राजाराणीच्या, पऱ्यांच्या, भुतांराक्षसांच्या, देवादिकांच्या गोष्टींनी आपले कल्पनाविश्व संपन्न होते. वय वाढत गेल्यानंतर आपले मन त्यात रमत नाही. नंतर आपल्याला शूरवीरांच्या साहसकथा, रहस्यकथा, गुढरम्य कथा, ऐतिहासिक कथा आवडू लागतात. तारुण्यात आपणांस प्रेमकथेचे आकर्षण वाटू लागते.

पूर्वीच्या कालखंडामध्ये कथा ही लिखित स्वरुपात अस्तित्वात नव्हती. तर तिचे स्वरुप लोककथेचे होते. एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे ही कथा चालत येत असते. प्रत्येकाच्या सांगण्याच्या लकबीनुसार त्यात बदल होत होता. परंपरेने ही कथा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत जात होती. मानवी जीवनात कथेला महत्वपूर्ण स्थान असून कथा सांगितल्याने व कथा ऐकल्याने आपणास मोक्षप्राप्ती होते, इच्छित फलप्राप्ती होते अशीही लोकांची श्रद्धा होती. म्हणजेच कथेच्या पाठीमागे धार्मीक दृष्टिकोन असल्याचे दिसते. म्हणून तर सुरवातीच्या कथामधून नीतीपर विचार व्यक्त झाल्याचे दिसते. सुरवातीची कथा लोककथेच्या स्वरुपात अस्तित्वात होती. लोकगीतातही कथेचा समावेश होतोच यावरुन असे म्हणता येईल की, कथा हा मुलत: काही उपजत प्रवृत्तींशी निगडीत असा एक जिवंत व मूलभूत वाङ्मयप्रकार आहे.

आपले विचार प्रकट करण्यासाठी भाषेचे साधन प्राप्त होताच मानवाने गोष्टी सांगायला सुरवात केली. आदिकाळापासून तो आजतागायत आपले छोटेमोटे अनुभव व कल्पना दुसऱ्याला सांगण्यासाठी कथेसारख्या सुटसुटीत, छोट्या आकाराच्या व लवचिक अशा या रचना प्रकाराचा त्याने आश्रय घेतला.

भारतीय साहित्यात कथा, विकासाच्या तीन अवस्थामधून गेलेली दिसेल —

१) पहिल्या अवस्थेत कथा वैदिक वाङ्मयात रामायण महाभारतासारख्या इतिहास—ग्रंथात व पुराणात मूळ विषयाच्या अनुषंगाने व बोधरुपाने आली. ही कथा देवतानुसारी दैवतकथा होती.

२) दुसऱ्या अवस्थेत कथा स्वतंत्रपणे लिहिली गेली. यांत बौध्द जातके, जैन चूर्णी, पंचतंत्र, हितोपदेश, कथासरित सागर, वेताळपंचविशी, सिहासंनबत्तीशी, शुकसप्तती आदि कथा वाङ्मयाचा समावेश होईल.

३) तिसऱ्या अवस्थेत मूळ पारंपारिक अद्भूत कथेला ललित वाङ्मयाचा घाट देण्याचा प्रयत्न झाला. दंडीचे 'दशकुमार चरित्र' बाणभट्टाची 'कादंबरी' किंवा सुबंधुचे 'वासवदत्ता' ही उदाहरणे देता येतील.

मराठी लिखित वाङ्मयात कथालेखनाचा पहिला मान जातो तो महानुभावी लेखकाकडे. मराठीतले सर्वात जुने कथा वाङ्मय आज उपलब्ध आहे ते महानुभाव पंथिय वाङ्मयात. चक्रधरांच्या व्यक्तिमत्वाची जाणीव आपणास लीलाचरित्रामधील कथामधून होते. म्हाईंभटांनी चक्रधरांच्या लीला संकलीत केल्या. त्यामध्ये चक्रधरांच्या जीवनातील काही प्रसंग कथारुपाने सांगितले आहेत. तेराव्या शतकाच्या पूर्वाधात केशव व्यासाने लिहिलेल्या 'दृष्टांता बाबत' चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाचे तत्वज्ञान सांगताना लिहिलेले निरनिराळे दृष्टांत या ग्रंथात एकत्रित करण्यात आले आहेत. हा एक—एक दृष्टांत म्हणजे छोटी—छोटी एक—एक गोष्टच आहे.

या दृष्टांतापैकी "कठियाचा दृष्टांत ", "आधारिए परिसुचा दृष्टांत", "जात्यंध आणि हत्ती दृष्टांत", "माणेकरांचा दृष्टांत", "तुपाभाताचिया घासाचा दृष्टांत", "डुळकैलेया बाळकाचा दृष्टांत", "पडलिये गाईचा दृष्टांत", "कुष्टियाचा दृष्टांत", "सींदेराणेयाचा दृष्टांत", "वटरोपाचा दृष्टांत" इत्यादी

दृष्टांतांची उदाहरणे देता येतील. उदाहरणादाखल आपण "वटरोपाचा दृष्टांत" पाहू तो पुढीलप्रमाणे –

"वटाचे रोप असे : ते सेलियां मेंढीयाचा खुरखीं जाए : एकाथा एक तयाभवंती कूप कांटी करी : आळे करी : पाणी घाली : मग ते प्रेरोहाते पावें : थोरला वटु होए : जरठू होए : एकु हस्ती वेंझ दोघेलयांही न वचे तथा हस्तीचेया घंटा बांधलेयाही न वचे ।। "

नंतरच्या संताच्या साहित्यामध्येही आपणांस कथा असल्याचे दिसून येते. संत साहित्यामध्ये परमेश्वर भक्तीच्या वेगवेगळ्या कथा आहेत. या कथा व्यक्तीप्रधान असल्याचे दिसते. ज्ञानेश्वर महाभारताला कथाग्रंथ मानतात व 'ज्ञानेश्वरी' कथा सांगावी तशी सांगतात. एके ठिकाणी ज्ञानेश्वरांनी कथेच्या विस्ताराची जाणीव करुन दिलेली आहे ते म्हणतात –

तव कथे पसरु जाहला । श्लोकार्थ दूरी गेला
कीजो क्षमा या बोला । अपत्या मज ।।

एकनाथाच्या साहित्यातही आपणास कथा दिसते, त्यांनी 'चतु:श्लोकी भागवत', 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणी स्वयवंर', 'भावार्थ रामायण', 'भारुडे' इ. मधून पौराणिक कथा सांगितलेल्या आहेत. नामदेवांच्या संताच्या चरित्रामधूनही आपणांस कथा दिसून येते.

पंत परंपरेचा विचार करताना आध्यात्मिक विषय व अनेक कथा रंगवून सांगण्याची लकब पंडिताकडे असल्याचे दिसते. यातूनच वामन पंडितांनी 'कृष्णकथापर रचना', रघूनाथ पंडिताने 'दमयंती स्वयवंर', श्रीधराने 'शिवलीलामृत', 'हरीविजय', 'भक्तीविजय', इ. ग्रंथ लिहिले. यामधूनही पौराणिक कथा आल्याचे दिसून येते. सर्वच पंडितांनी कथाकाव्ये लिहिली आहेत.

नंतरच्या शाहिरांनी तंतू वाद्याच्या जोरावर पराक्रमी पुरुषांचे गुणगाण केले. हा शाहिरांचा पोवाडा म्हणजे वीरपुरुषांची कथाच आहे. तसेच निपुत्रिका गतभृर्तका स्त्रीच्या व्यथा, दोन बायकांनी केलेली नवऱ्याची फजितीही या लावण्यात येते.

एकदंर विचार करता कथा वाङमयाला अशी प्राचीन परंपरा असल्याचे दिसते.

मराठीत कथा ही प्रारंभी लोककथा म्हणूनच निर्माण झाली नंतरच तिला लीखीत स्वरुप प्राप्त झाले. अर्वाचीन मराठी साहित्यातील कथा वाङमयाला सुरवात प्रामुख्याने १८०६ मध्ये झाल्याचे दिसते. या कालखंडामध्ये तामीळनाडूमधील तंजावर येथील शिवाजी राजांचे वंशज सरफोजी राजे भोसले यांनी त्यांच्या दरबारातील सकरवन पंडीत याच्या साह्याने इसापनीतीच्या गोष्टीचे भाषांतर करुन ते 'बालबोधमुक्तावली' या नावाने छापले. नंतरच्या कालावधीमध्ये विल्यम केरी यांनी गोष्टीची पुस्तके मोडी लीपीमध्ये छापली. 'पंचातत्र', 'हितोपदेश', 'सिंहासन बत्तीशी' इ. ग्रंथ १८१६ मध्ये छापले गेले.

नंतर १८२८ मध्ये बापू छत्रे यांनी 'इसाफनीती कथा' नावाचं पुस्तक छापलं. गेस्फर्ड यांनी 'बालमित्र भाग एक' नावांच गोष्टीच पुस्तक छापले. विष्णुशास्त्री बापट यांनी 'नीतीदर्पन' नावांच पुस्तक छापले. याच कालखंडामध्ये शृंगार कथाही लिहिल्या गेल्या. डॉ. रामजी गणोजी हे सैन्यात डॉक्टर होते. यांनी १८५४ मध्ये 'स्त्रीचरित्र' नावांच पुस्तक लिहिलं नंतर त्यांनी आपल्या मुलाला बोध करण्यासाठी 'नारायण बोध' नावांच पुस्तक लिहिलं. विष्णुशास्त्री

चिपळुणकरांनी अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टीचं 'हतीमताई' नावांच पुस्तक लिहिलं. त्र्य. ना. मंचरकर यांनी चमत्कारिक न्यायाच्या व अकलेच्या गोष्टी लिहिल्या. वि. स. नवलकर यांच 'गुलबकावली' हे पुस्तक मराठीत आलं. चिंतामणी दिक्षीत जोशी यांनी 'विदग्धस्त्री चरित्र' नावांच पुस्तक लिहिलं. गोविंद मोरोबा कार्लेकर यांनी चातुर्यकथा लिहिल्या.

याच कालखंडामध्ये ऐतिहासिक कथाही लिहिल्या गेल्या, त्यामध्ये मोरोबा कान्होबा विजयकर यांनी 'घाशीराम कोतवाल' ही कथा लिहिली.

प्रामुख्याने या कालखंडामध्ये मुलांसाठी कथा व मध्यमवर्गासाठी शृंगारिक कथा लिहिल्या गेल्या. लोकांच्या मनोरंजनासाठी या कथा लिहिल्या. परंतु या कथा प्रामुख्याने भाषांतरीत असल्याचे दिसून येते.

## मराठी कथेतील विविध प्रवाह

मराठी कथेतील विविध प्रवाहांचा विचार करत असताना आपल्या असे लक्षात येते की, अगदी सुरवातीची असणारी कथा ही प्रामुख्याने भाषांतरीत असल्याचे दिसून येते. सुरवातीची कथाही मनोरंजन करण्यासाठी, बोध करण्यासाठी लिहिली गेली. नंतरच्या कालखंडामध्ये मात्र या कथेमध्ये बदल होत गेल्याचे दिसून येते. महाराष्ट्र हा खेड्यांचा आहे. बहुसंख्य जनता ही खेड्यापाडयातून, दऱ्याखोऱ्यातून रानावनातून राहते. या ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू शेतकरी आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण बीजे पहिल्यांदा दिसतात ती महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' मध्ये या पार्श्वभूमीवर ग्रामीण कथेचा उदय झाला. हरिभाऊ आपटे यांनी 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा १८९८ च्या आसपास लिहिली. ही कथा म्हणजे महत्वपूर्ण कथा होती.

"ही परिस्थिती १९२० नंतर बदलली. या काळात देशात गांधीजींच्या नेतृत्वाचा प्रभाव पडू लागला आणि यातूनच ग्रामीण जीवनातील विषमता, अज्ञान, दारिद्र, अनिष्ट रुढी आणि परंपरानिष्ठता, अभिमान शुन्यता इ. नष्ट करुन त्यांची अस्मीता जागृत करण्याचे आत्मभान देण्याचे प्रयत्न सुरु झाले. लेखक वर्गाने आणि ग्रामीण जीवनासंबंधीचे काही अंदाज बांधले. समस्या निश्चीत केली आणि तेथील ग्रामजीवन निसर्गरम्य वातावरण, लेखक मनाला जाणवणाऱ्या समस्या कशा सोडविता येतील याचे अंदाज बांधून लेखन करावयास प्रारंभ झाला. १९२५ ते १९४० या काळात निर्माण झालेले ग्रामीण साहित्य बघितले तर याचा प्रत्यय येतो."[२] असे वासुदेव मुलाटे म्हणतात.

नंतरच्या कालखंडामध्ये माणुसकीच्या भावनेने, निरपेक्ष भावनेने श्री. म. माटे यांनी कथालेखन केल्याचे दिसून येते. स्वतःच्या स्वानुभवातून हे कथालेखन केले असल्याचे दिसून येते. त्यांचा पहिला कथासंग्रह 'उपेक्षितांचे अंतरंग' १९४१ साली प्रकाशित झाला. त्यांच्या दुसऱ्या 'माणुसकीचा गहिवर' या कथा संग्रहामधील कथांचे स्वरुप न्याहाळले तर त्या कथा ग्रामीण, उपेक्षितांचे चित्रण करणाऱ्या दिसून येतात. त्या कथा अंतकरणापासून लिहिल्या गेल्या आहेत. ग्रामीण लोकांच्या जीवनाचा, अंतरंगाचा शोध घेण्यासाठी लिहिलेल्या या कथा आहेत. अशा कथा मराठी साहित्यात पहिल्यांदाच निर्माण झाल्या म्हणून माट्यांना ग्रामीण कथेचे जनक म्हटले जाते हे खरे आहे.

याच कालखंडामध्ये कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावरच्या परिसराला चित्ररुप देऊन काव्यात्म पातळीवरच्या कथा निर्माण झाल्या. ग. ल. ठोकळ यांनी ग्रामीण पातळीवरचा संघर्ष, ग्रामीण माणसांचा रांनदाडगेपणा, जुलूम जबरदस्ती, रंगेलपणा चित्रित करणाऱ्या, नाट्यमय घटना असणाऱ्या कथा लिहिल्या.

१९४६ च्या वेळी एकूण मराठी साहित्यातच परिवर्तन झालेले दिसते. तिचे लक्षण नवकथा असे सांगता येईल. या कालखंडातील कथेच्या संदर्भात तर घटनेपेक्षा भावावस्थेला अधिक प्राधान्य देण्यात येवू लागले. व्यक्तीचे जीवन आणि समाज यांच्या संबंधाचे दर्शन घडविण्यात येऊ लागले. कथानकाच्या साच्यामधून कथेची मुक्तता झाली. या कालखंडात ग्रामीण कथेचे स्वरुपही बदलले.

शरणकुमार निंबाळे म्हणतात – "एकूण मराठी कथे बरोबरच ग्रामीण कथाही बदलली. व्यंकटेश माडगूळकर यांनी नवकथेच्या सुरवातीच्या काळातच, ग्रामीण कथेत परिवर्तन घडवून आणले. कथा स्थूलतेकडून सुक्ष्मतेकडे वळली. ग्रामीण माणसाचे मन, त्याचे चालणे, बोलणे, वागणे त्यांच्या भोवतीचा परिसर, त्यांची संस्कृती याचे उत्तम आकलन असलेली कथा लिहिली."[३]

१९४६ ते १९६० च्या दरम्यान व्यंकटेश माडगूळकराबरोबरच शंकर पाटील, द. मा. मिरासदार, अण्णा भाऊ साठे यांनी ग्रामीण कथा लिहिल्या. मिरासदारांच्या कथामधून खेड्यातून चावडीत बसून किंवा विड्यांचा धूर सोडीत गप्पा मारणारी, इरसाल गप्पीष्ट माणसे जागोजाग भेटतात. त्यांना काहीतरी चमत्कारीक व विलक्षण घडवायचे असते. भूताखेतांच्या विषयी गप्पा मारणारी दारुडी मंडळीही त्यांच्या कथामधून भेटतात.

१९६० ते १९७० या काळात ग्रामीण वातावरणात आणखी बदल झाला. मध्यमवर्गीय समाजातील लेखनाबरोबरच प्रत्यक्ष कष्टकरी ग्रामीण समाजातून आलेले संवेदनशील लोकही लिहू लागले. याशिवाय यंत्र आणि विज्ञान यामुळे खेड्यातून आलेल्या सुधारणा बद्दल आणि यातून निर्माण झालेल्या नवीन समस्या, ग्रामीण मनावर झालेला परिणाम यांचेही प्रत्ययकारी दर्शन, कथेत निवेदनासाठी बोलीचा वापर केला जावू लागला.

नंतरच्या कालखंडामध्ये म्हणजेच १९७० ते १९८० या दशकात आणखी काही लेखकांची भर पडली. यातूनच खेड्यातील खाजगी प्रश्न, सावकारी प्रश्न, दुष्काळामुळे होणारी होरपळ, शैक्षणिक संस्थामधून चालणारा गैरव्यवहार, सरकारातून निर्माण झालेले प्रश्न इ. चे चित्रण अत्यंत संयमाने आणि नेटकेपणाने हे लेखक करु लागले.

१९८० नंतरच्या या ग्रामीण माणसाच्या शोषण मुक्तीसाठी महाराष्ट्रात घडणाऱ्या घटनांचे पडसाद टिपणारे साहित्य कथा निर्माण झाल्या. रा. रं. बोराडे, नागनाथ कोतापले, आनंद यादव, श्रीराम गुंदेकर इ. कथाकारांच्या संग्रहामधून आजच्या ग्रामीण उपेक्षाभंगाचे दु:ख तरुण ग्रामीण मनाचा उद्रेक चित्रित झाला आहे.

अशा प्रकारे मराठी कथा विविध प्रवाहातून चित्रित होत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ती ग्रामीणत्वाचा साजशृंगार लेऊन अविष्कृत झाल्याचे आपणास दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली व तारुण्यात पदार्पण केलेली पिढी, बेकार बनून दिशाहिन अवस्थेत फिरत होती. या उद्रेकाचा स्वर १९७५ नंतरच्या कथेतून उमटू लागला. यातूनच विद्रोहीकथा साहित्याची निर्मिती झाली.

## ग्रामीण साहित्य

ग्रामीण साहित्याचा विचार करताना प्रथम ग्रामीण साहित्य म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. अनेक विचारवंतानी ग्रामीण साहित्याच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या खालीलप्रमाणे आपणास सांगता येतील.

## १. डॉ. आनंद यादव

"खेडेगांव तेथील जीवन पद्धती, तेथील रीती, शेती, निसर्गाशी, मातीशी असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपुर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न, समस्या इ. सर्व अनुभूतीतून निर्माण झालेले साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय."

## २. डॉ. गो.मा. पवार

"ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण जीवनाचे ग्रामीण मनाचे चित्रण करणारे साहित्य होय." या ग्रामीण साहित्याची काही वैशिष्टये आपणास दिसून येतात ती पुढीलप्रमाणे

### १) ग्रामीण साहित्याची भाषा

ग्रामीण भाषा हे ग्रामीण साहित्याचे महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. ग्रामीण भाषेमुळे ग्रामीण कथेला चैतन्यनूर्णता आलेली आहे. शिवाय या ग्रामीण भाषेमुळेच लेखकाच्या मनातील भावना बरोबर व्यक्त होतात व उत्कंठता वाढत राहते. ग्रामीण भाषेमुळे ग्रामीण कथेचा दर्जा वाढतो. ग्रामीण कथा इतरापेक्षा वेगळी ठरते. ती ग्रामीण भाषेमुळेच होय व या भाषेमुळेच ग्रामीण साहित्य जिवंत व प्रत्ययकारी होताना दिसून येते. ही भाषाच ग्रामीण साहित्याचे अंग बनून राहते. उदा. शंकर पाटलांची 'धींड' ही कथा. तिच्यातील भाषेचा हा नमुना

"पंधरा ऑगस्टच्या मुहुर्तावर सगळया गावानं मिळून ठराव पास केला होता. कोण दारु पिईल त्याची गाढवावरुन धिंड काढायची, असं सर्वानुमते ठरलं होतं आणि तेव्हापासून लोक ह्याची वाट बघत होते. कोण सापडतोय ह्या पाळतीवरच राहिले होते. एकमेकांवर पाळत ठेवून लोक असे वाट बघत होते आणि अवघ्या चार दिवसांनीच हा प्रकार घडून आला होता. पंधरा ऑगस्टला ठराव पास केला होता आणि वीस ऑगस्टला आज राऊ खोत तावडीत सापडला होता । चांगला गावला होता. ज्याला त्याला सुरसुरी आली होती. दम निघत नव्हता. हा हा म्हणता लोकांनी जुन्या खेटरांची माळ तयार केली. हार झकास झाला होता. ज्यानं त्यानं आपला एकेक जोड त्यात ओवलाच होता । शिवाय एक नेटकं गाढव आणुन तयार ठेवलं होत. एकाला चार मोफत बत्त्या आल्या होत्या. अशी सगळी तयारी पूर्ण झाली होती आणि गांव सारं खोताचीच वाट बघत चावडीवर खोळबंल होतं. सरपंच राजाभाऊ विभूतेही चावडीत येऊन बसले होते. तवनाम मगदूम, धनपाल शेटे, आबालाल मुजावर आणि गणू तेली ही पंच मंडळीही हजर होती. सारा लवाजमा गोळा झाला होता. पण राऊ खोताचाच अजून पत्ता नव्हता."

## २) लोकांच्या रुढी परंपराचे चित्रण

ग्रामीण साहित्यामध्ये लोकांच्या रुढी परंपरा त्यांची संस्कृती श्रद्धा : अंधश्रद्धा यांचेही चित्रण येते व हे ग्रामीण साहित्याचे महत्वपूर्ण वैशिष्टय ठरते. उदा. शंकर पाटील यांच्या 'वळीव' या कथेतील अंधश्रद्धेचा नमुना

"शिवराम, बाळा तेवढ ऐदान तर टाक रं अंगनात .... तुमी कशाला निघालाय भाईर! पायाळू माणसांनं इजा कडाडताना भाइर कशाला पडावं? ... "

## ३) ग्रामीणता

ग्रामीण साहित्य हे व्यक्तीच्या भावभावना बरोबरच ग्रामीण लोकांच्या जीवनाची जाणीव करुन देते. ग्रामीण लोकांचा रंगेलपणा व्यक्त करते. आपआपल्यातील हेवेदावे तंटेबखेडे यांचेही जीवन चित्रण येते म्हणजेच ग्रामीण साहित्यातून ग्रामीणत्व व्यक्त होते. उदा. शंकर पाटील यांच्या 'कणव' या कथा आपणास पाहता येईल. त्यातला हा ग्रामीण नमुना

"मामा खवळून म्हणाला, "हानामाऱ्या करा असं आमच्या भाच्याला आमी सांगितलं हुतं व्हय? का परमिट दिलं हुतं तवा निस्तरावं? "

## ४) शेतकऱ्यांचे चित्रण

ग्रामीण म्हटले की प्रामुख्याने शेतकरी डोळयासमोर येतो. त्यांचे चित्रण विपुल प्रमाणात येते व हे ग्रामीण साहित्याचे वैशिष्य्य ठरते. उदाहरण म्हणून आपणास बोराडे यांच्या कथेचे घेता येईल. शेतीसाठी असे सतत आभाळाकडे लक्ष ठेवून असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनाचे चित्रणही बोराडे यांच्या कथेत येते.

'बलामत' या कथेतील गावात गाडी प्रवेशताना केलेले हे चित्रण या दृष्टीने अभ्यासासारखे आहे.

"बैलांना वाट ओळखीची होती; पायाखालची होती. अधूनमधून एकारीचा रस्ता लागला होता, एका बाजूच चाक वरजात होतं व दुसऱ्या बाजूच चाक खाली जात होतं. नदी ओलांडून गाडी वर आली, मारुतीनं मान उंचावून पाहिलं आखरबाई सामसुम झाली होती. कुठल्यातरी घरात एखादा दिवा जळताना दिसत होता. पांदीवली घाण येऊ लागली तेव्हा मारुतीनं नाकाला धोतर लावलं व बैलाच्या पाठीवर चाबूक टाकला. बैल अधिक वेगाने चालू लागले. गांव कोसाच्या दगडी वाटेवर धाव घासू लागली."

## ५) स्त्रीयांच्या भावभावनांचे चित्रण

ग्रामीण साहित्यात स्त्रीयांचे चित्रण मोठ्या प्रमाणात आढळते या स्त्रीया कष्ट करणाऱ्या कुटुंबाचा गाडा ओढणाऱ्या दिसून येतात. अशा या स्त्रीयांच्या भावभावनांचे चित्रण ग्रामीण साहित्यातून दिसून येते व हे ग्रामीण साहित्याचे वैशिष्टय ठरते. उदा. माडगूळकरांच्या 'तांबोळ्याची खाला' या व्यक्तिचित्रणात्मक कथेतील 'खाला' सुद्धा सोशिक आहे. या खालाला नवरा नाही. दुरचे किंवा जवळचे असे कुणी नात्याचे नाही. एकटी असाह्य खाला डाळचुरमुरे विकून जगते.

माडगूळकर लिहितात –

"ती धडपडत होती, श्रमत होती. चार माणसांशी गोड बोलून राहत होती. जगात केवढ्या उलाढाली होऊन राहिल्या होत्या. पण कशाची दाद नव्हती फिर्याद नव्हती. ती आपली नीट नाकासमोर चालत होती."

वि. स. सुखठणकरांच्या कथेतील वर्णन पाहण्यासारखे आहे. उदा. 'जाईजुई' या दीर्घकथेत वेश्यांच्या घरात जन्मलेल्या त्यांच्या तरुण मुली आणि वेश्याकडे येणाऱ्या व्यसनी पुरुषांच्या स्त्रिया यांना सोसावे लागणारे दु:ख त्यांनी चित्रित केले आहे.

## ६) निसर्गाभिमुखता / समाजभिमुकता

ग्रामीण साहित्य हे निसर्गाभिमुख आल्याचे दिसून येते. तसेच ते समाजभिमुक आहे. निसर्ग नाकारुन ग्रामीण साहित्याची निर्मितीच होऊ शकत नाही. निसर्गाचे वर्णन हे अपरिहार्य आहे.

उदा. चारुता सागरांच्या कथातून अविष्कृत होणारा परिसर हा साधारणत: सांगली–मिरज यांच्या आसपासचा आहे. त्यांच्या कथेतून भिकार–भणंग म्हणून समजल्या जाणाऱ्या 'पारधी', 'नागवाले', 'नंदीवाले', 'डोंबारी', 'जोगते' यांचे चित्रण येत असल्याने त्यांच्या लेखनातून अविष्कृत होणाऱ्या परिसराची व्याप्ती त्या त्या लेखनकृतीनुसार कमी–अधिक होते.

तसेच रंगराव बापू पाटील यांच्या 'हिरवी काच' या कथेतील वर्णन पहा –

"उसाचं रान वाऱ्यानं सळसळत होतं. धावेवरच्या जांभळीच्या पानांची सळसळही त्यात मिसळत होती. केळीच्या बागेतून दोन–तीन धनछड्यांचा आवाज उठत होता आणि घरवजा असलेल्या त्या छपराच्या भगदाडातून वारा सू S S S करुन वाहत होता. मेंढीच्या खोंबाऱ्याला अडकविलेला कंदील भगभगत होता."

ग्रामीण साहित्याची ही वैशिष्ट्य असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर विचार करताना आपणांस प्रादेशिक साहित्य म्हणजे काय? याचा विचार करणे आवश्यक आहे.

## प्रादेशिक साहित्य

प्रादेशिक साहित्य हा शब्द मराठी साहित्यात १९४० च्या आगेमागे रुढ झाला. त्यानंतरच्या विशिष्ट कालखंडामध्ये लिहिल्या गेलेल्या साहित्याला प्रादेशिक साहित्य ही संज्ञा वापरली.

श्रीराम गुंदेकर म्हणतात – "प्रादेशिक साहित्याची प्रेरणा शोधताना आणखी एका गोष्टीचे भान असणे आवश्यक आहे. जानपदात जन्मलेले लेखक पुढे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने नागर जीवनात स्थिरावले पण त्यांची ओढ ही गांव–प्रदेशाकडे होती. आपल्या अंतर्मनाची ओढ व्यक्त करण्यासाठी व आपल्या प्रदेशाशी नाते ठेवण्यासाठी प्रादेशिक लेखन करणे ही त्यांची मानसीक गरज होती. आणि यात अनैसर्गिक असे काहीच नाही. काही लेखक गाव–प्रदेशात राहून अवतीभवतीच्या लोकांचे प्राण्याचे जीवन, निसर्गाशी दोस्ती आणि संघर्ष इत्यादी प्रसंग, जगण्याचाच अनुभव साहित्यात मांडत होते." [४]

आनंद यादव प्रादेशिक साहित्याबाबत म्हणतात – "एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन संस्कृती, परंपरा, जीवन संकेत, रीती, समूह जीवनातील भावभावना आणि या सर्वांतून निर्माण झालेले साहित्य हे सर्व प्रदेशिक साहित्य म्हणतात." [५]

या पार्श्वभूमीवर विचार करताना मराठी साहित्यातील पहिला प्रादेशिक कथांचा संग्रह वि. स. सुखठणकर यांचा 'सहयाद्रीच्या पायथ्याशी' असल्याचा पहावयास मिळतो.

## प्रादेशिक साहित्य व ग्रामीण साहित्य फरक

ग्रामीण साहित्य व प्रादेशिक साहित्य यांच्यातील फरक सांगत असताना पुष्कळ वेळा ग्रामीण साहित्याचा संबंध कथेशी जोडला जातो, व प्रादेशिक साहित्याचा संबंध कादंबरीशी जोडला जातो. प्रादेशिक साहित्यात संपूर्ण प्रदेश वैशिष्टयासह अमूर्त झालेला असतो. तेथील ऋतुचक्र, पीक पद्धती, हंगाम, पक्षी, प्राणी, त्यांची बोलीभाषेतील नांवे, नद्या, प्रदेश, लोकांची आहारपद्धती, बोलण्याच्या लकबी, ढबी यात येतात. मात्र नागर जीवनाची दखल घेण्याची गरज प्रादेशिक साहित्याला नसते.

आनंद यादव म्हणतात – "जगातील बहुतेक मोठी व उद्योगप्रधान शहरे ही कमी–अधिक प्रमाणात त्या–त्या प्रदेशापासून तुटुन, उद्योगप्रधान वैश्विक संस्कृतीची बेटे झालेली असल्याने ती प्रादेशिक वैशिष्टये संपूर्ण नव्हे तर मोठ्या प्रमाणावर गमावून बसलेली असतात." [६]

प्रादेशिक साहित्यात ग्रामीण जीवन दर्शन घडते म्हणजेच असे असले तरी प्रादेशिक साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणता येणार नाही. दोन्ही साहित्यात शेती आणि शेतीशी संबंधित विषय यांचे चित्रण होताना दिसते. लोकजीवन हे सामान्य विषय आहेत.

तर ग्रामीण साहित्यात व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून अनुभवांची मांडणी केलेली असते. व त्यात ग्रामीण बोलीचा वापर केलेला असतो. म्हणजेच ग्रामीण साहित्यात विशीष्ट व्यक्तीचा उल्लेख मोठ्या प्रमाणावर आल्याचे दिसून येते. उदा. भुजंग, वळीव इ. ग्रामीण साहित्यात 'ग्रामीण जाणीवा' व्यक्त करण्यावर अधिक भर असतो. ग्रामीण साहित्यात संबंध प्रदेश त्याच्या रुपागुणासह व्यक्त झालाच पाहिजे अशी अपेक्षा नसते. उदा. श्री. ना. पेंडसे यांच्या 'हद्दपार' या कादंबरीत दारिद्र्याने गांजलेला कोकण साकार होतो. व्यँकटेश माडगुळकर यांच्या 'बनगरवाडीत' व्यक्ति वैशिष्टयासह संपूर्ण माणदेश जिवंत झालेला दिसतो. पण आनंद यादव

यांच्या 'गोतावळा' किंवा रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' मध्ये संबंध प्रदेश साकार होत नाही. त्या प्रदेशातील भाषीक वैशिष्टयामुळे त्या कादंबरीतील घटना अनुक्रम कोल्हापूर आणि लातूर जिल्हयात घडतात एवढेच कळते. तरी सर्वार्थाने त्यांना प्रादेशिक कादंबऱ्या म्हणता येणार नाही. त्यात प्रादेशिकता येणे अपेक्षित नाही.

वरील विचार केल्यानंतर प्रादेशिक साहित्य व ग्रामीण साहित्य यातील फरक लक्षात येतो. म्हणजेच दोन्हीमध्ये साम्य असले तरी निश्चितपणे फरक असल्याचे आपणास दिसून येते. म्हणजेच प्रादेशिक साहित्य निश्चितपणे वेगळे आहे.

वरील पार्श्वभूमीवर विचार करताना ग्रामीण कथेचा प्रारंभ व विकास कसा होत गेला, याचा विचार करणे आवश्यक आहे. बदलत्या वास्तवतेचे चित्रण ग्रामीण कथेमध्ये येते आहे का? याचा विचार करणे गरजेचे आहे.

## ग्रामीण कथा – प्रारंभ – विकास

ग्रामीण कथेचा कलेच्या दृष्टीने वेगळा असा प्रकार नाही. इतर कथा प्रमाणेच ती कथा आहे. 'ग्रामीण' हे तिचे विशेषण आहे. खेड्यातील म्हणजेच ग्रामातील अनुभूती ग्रामीण कथेतून व्यक्त होते. खेडेगांव, तेथील जीवनपद्धती, तेथील शेती, तेथील निसर्गाशी मातीशी असलेला मानवी पण प्रदेशातील वैशिष्टयपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये ह्या कथेत येतात.

ग्रामीण जीवनातील घटनांना स्थान मिळाले ते वास्तववादी काळात. हा वास्तववाद पहिल्यांदा मराठी साहित्यात हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यामधून चित्रित झाला. जीवन, समाज सुधारणा, स्त्रीपुरुष संबंध, शिक्षण मागासलेपणा, रुढी, शेती इ. विषयक नवे विचार हरिभाऊ आपटे यांनी मराठी कथेत प्रभावीपणे चित्रित करावयास सुरवात केली. याला कारणही त्यावेळची परिस्थिती होती. पिराजी पाटील यांची धनुर्धारीची कादंबरी किंवा स्वत: हरिभाऊंची 'काळ तर मोठा कठीण आला' ही स्फुट गोष्ट याच काळात जन्माला आली. आज ग्रामीण कथेच्या वाटचालीमध्ये हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' कडे पाहावे लागते. यापूर्वी तसे ग्रामीण लेखन सापडत नाही. १८९७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला. त्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीला अनुलक्षून ही कथा लिहिली. ही कथा म्हणजे शेतकऱ्यांच्या वाताहतीची कथा आहे. 'डेक्कनसभेच्या' कागदपत्रात ही माहिती त्यांना वाचावयास मिळाली. तिच्या आधारे हरिभाऊंनी ही कथा लिहिली आहे. ही कथा हकीकतीसररखी वाटत असली तरी तिच्यात तेवढी ताकद आहे. शेतकरी जीवनातील सूक्ष्म मर्म आणि छटा त्यात सापडत नाहीत. गोष्टीची शक्ती मूळ कथानकातच आहे. वाताहतीमुळे निर्माण झालेले कारुण्य, दारिद्र्य दुर्दशा इ. गोष्टींच मनाचा ठाव घेतात, कथेच्या शेवटी अत्यंत गडद रंग भरत जाऊन ती संपलेली आहे.

डॉ. ल. म. भिंगारे या कथेच्या बाबतीत म्हणतात की, "हरिभाऊंचे या कथेच्याद्वारे नवनवे कथानुकूल विषय शोधण्याचे सामर्थ्यच अधिक दिसते." ७

आनंद यादव म्हणतात – "पण कथा वाचताना सामर्थ्य वाटत नाही. हरिभाऊंना या जीवनाची माहिती दिसत नाही. तिच्यातील संवादाची केलेली टाळाटाळ स्पष्ट दिसते आहेत तेही संवाद नागर भाषेत, नागर पद्धतीचे आहेत. त्या कथेत भरलेली दुष्काळातील माहितीच सामर्थ्यवान आहे. या माहितीच्या सामर्थ्यामुळेच ही कथा लिहावी असे त्यांना वाटले असावे. शिवाय ही कथा त्यांच्या इतर कथांच्या तुलनेने अगदीच प्राथमिक स्वरुपाची वाटते, हेही लक्षात आल्याशिवाय रहात नाही." ८

हरिभाऊंच्या इतर कथाप्रमाणे या कथेत रचनाकौशल्य वगैरे काही दिसून येत नाही. कारुण्य, अद्भुतता, घटनावर्णने, नाट्य याबरोबर ते वाहवत गेल्याचे दिसतात, मात्र ही कथा एक वाङ्मयीन अपघातच होता. हे मान्य करावे लागते. हे नाकारुन चालणार नाही. ग्रामीण जीवनाविषयींच्या खास जाणीवा या कथेत दिसून येत नाहीत. ग्रामीण वाङ्मयाच्या विपुलतेमुळे तिची पाळेमुळे शोधत असताना तिचा विचार करावा लागतो. इतकेच या कथेने ग्रामीण वाङ्मयासाठी काही केले आहे असे वाटत नाही.

ग्रामीण जीवनाविषयींच्या वाङ्मयीन जाणीवा मराठी साहित्यात प्रथम वि. स. सुखठणकर यांनी निर्माण केल्या. १९३१ साली त्यांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा आपला आठ प्रादेशिक कथांचा संग्रह प्रसिद्ध केला. 'आजचे व कालचे गोमंतक' असेही तिचे पर्यायी नांव आहे. 'आक्रमण पहिले', 'आठ स्वतंत्र प्रादेशिक कथा' अशाही सूचना त्यावर आहेत. त्यांनी या संग्रहातील कथा १९२६–२८ पासूनच लिहिल्या असतील असे दिसून येते. ग्रामीण जीवनाकडे वळण्याची त्यांची पद्धत इतर कथाकारापेक्षा वेगळी असल्याचे दिसून येते. त्यांनी आजचा व कालचा गोमंतक याचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न केला आहे.

गोव्यातील देवदासींची चाल व त्यांची होणारी कुचंबणा, शेजारशेजारच्या गावातील वैर, गावकरी आणि गावातील श्रीमंत, तसेच वतनदार यामधील हेवेदावे, भांडणे त्यामुळे गांवच्या शेतीची व घराण्याचीही होणारी नासाडी, गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या शेजाऱ्यामध्ये पेरलेले नव्या विचारसरणीतून आलेले धार्मिकतेचे खूळ व आंधळा अभिमान परकियांच्या लाचारिला चटावलेली देशी मनोवृत्ती इत्यादी गोष्टी त्यांनी मांडलेल्या आहेत. त्यात अनेक बाह्य घटक मिसळून गेलेले आहेत.

१९२० नंतर मात्र संपूर्ण महाराष्ट्रीय जीवनावर गांधीवादाचा प्रभाव पडत गेला. याच काळात समाजवाद, साम्यवाद यांचेही लोण भारतात आले. याचा परिणाम लेखकांच्या लेखननिर्मितीवर झाल्याचे दिसून येते. देवदासींचे चित्रण करताना त्याचा सामाजिक अर्थ लावायला ते विसरत नाहीत. गावातील अनेक भांडणे सांगताना ते ऐतिहासिक अभिमान जागृत करु पाहतात, शेतकरी आणि इनामदार यांच्या कोर्टकचेऱ्या व हेवेदावे यांचे लेखन करताना साम्यवादाची शिकवण देऊन जातात. शेजारच्या भांडणातून मानवी दर्शन न घडविता हिंदू व ख्रिश्चनांनी कसे एकत्र आले पाहिजे हे सांगतात. सुखठणकरांच्या कथेमधून ग्रामीण माणसांच्या प्रवत्ती कळतात. गावागावातील हेवेदावे स्पष्ट होतात. ग्रामीण जीवनाचा परिसर उभा करण्याची त्यांची प्रेरणा साम्यवादी, गांधीवादी, देशप्रेमाची, स्वतंत्रतेची आहे हे चिसरता येत नाही. वाङ्मयीन अनुभवासाठी एक प्रचंड क्षेत्र मोकळे असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

आनंद यादव म्हणतात –

"सुखठणकरांचे कार्य ग्रामीण वाङ्मयाच्या संदर्भात पायासारखे आहे." १

वि. स. सुखठणकरांच्या नंतर लगेच लक्ष्मणराव सरदेसाई यांनीही लक्षात घेण्यासारखे गोमंतकिय जीवनाशी निगडीत असे साहित्य लिहिले आहे. त्यांचे 'कल्पवृक्षांच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', 'ढासळलेले बुरुज' इ. वैशिष्टयपूर्ण कथासंग्रह प्रकाशित आहेत. पण त्यांच्या व्यक्तिमत्वानुसार काही रचनात्मक वैशिष्टये त्यांच्या कथामधून दिसून येत असली तरी सुखठणकरांच्या निर्मिती प्रेरणेपेक्षा त्यांच्या प्रेरणा फारशा वेगळ्या आहेत असे दिसून येत नाही. 'मायेचा वारसा', 'राण्याचें ब्रीद', 'गतकालचे पडसाद', 'गावकऱ्यांचा संदेश', 'भाग्यवंत' 'ढासळलेला बुरुज', 'मेणाची बाहुली' इ. कथामधून त्यांचा प्रत्यय येतो. अशा प्रकारच्या कथात ते आणि सुखठणकर फारसे वेगळे वाटत नाहीत.

पण सरदेसाई हे 'मोडलेला माड', 'जरीचे पातळ' 'गुरवाचे रक्त' इ. कथामधून वरील कथेच्या प्रेरणेपेक्षा काहीशा वेगळ्या प्रेरणेने लिहितात. ही प्रेरणा मानवी स्वभावाचे नमुने स्त्रीपुरुष संबंध यातून निर्माण झाल्याचे दिसून येते. सरदेसाई यांनी नवीन प्रवाहांचे सातत्य निर्माण केले. १९४० मध्ये त्यांचा 'ढासळलेले बुरुज' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला.

त्यानंतर मात्र १९४१ मध्ये श्री. म. माटे यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' हा संग्रह प्रसिद्ध झाला, आणि मराठी कथेला लेखन नवे धुमारे, नव्या जाणिवा पालवल्या तोपर्यंतचे सुखठणकर, सरदेसाई बंधु, व बा. द. सातोस्कर यांनी प्रादेशिक कथेला खतपाणी घातले. माटेंनी अनाथ बन्सी, दरोडेखोर तरी प्रामाणिक पिऱ्या, मुख्याने मेलेली सावित्री, पिकासाठी टाहो फोडणारा भिवा, गंगाराम, सगाजी, बहिरनाक, राम जोशी ही माणसे आपल्या व्यक्तिमत्वासह उभी केली. श्री. म. माटे हे समाजसुधारक होते. ते प्रचारकी पुढारी नव्हते. हे विसरता येत नाही. श्री. म. माटेंनी आयुष्याची पन्नाशी उलटल्यानंतर हे लेखन केले आहे. त्यांनी चित्रित केलेली माणसे त्यांना माणूस म्हणून योग्य वाटली. या माणसांच्या जीवनाच्या रेषाच इतक्या दमदार आहेत की, त्यातून जीवनाचा अर्थ काढणं सहज शक्य होतं. म्हणून आनंद यादव म्हणतात –

"श्री. म. माटेंनी ग्रामीण कथेचे हरिभाऊ म्हटले तर त्यांच्या लेखनाशी ते सुसंगत होईल असे वाटते." [१०]

ललित वाङ्मयामध्ये समाज देश, वाद, विचार, घटना यांच्यापेक्षा माणसांच माणूस म्हणून मोल जास्त असतं. श्री. म. माटे यांनी ग्रामीण कथेत माणुसकी साधली.

आनंद यादव म्हणतात –

"हरिभाऊ आपटे यापूर्वी मराठी कादंबरीचे अस्तित्वात असूनही आधुनिक मराठी कांदबरीचे जनकत्व हरिभाऊकडे जाते; तसेच ग्रामीण कथेचे जनकच श्री. म. माटे यांच्याकडे जाते. तसेच माटे यांना ग्रामीण कथेचे हरिभाऊ म्हटले तर ठोकळ यांना फडके म्हणावे लागेल. कारण ना. सी. फडकें यांनी जे स्वरुप मराठी कथेला दिले तेच स्वरुप ग्रामीण कथेला काही प्रमाणात ग. ल. ठोकळ यांनी दिले." ११

ग. ल. ठोकळ हे माटे यांच्या बरोबरीने कथा लेखन करताना दिसतात. ठोकळांनी आपल्या कथेमधून खेडेगावातील अज्ञान, रानदांडगेपणा, माणसामधील व गावागावातील हाडवैर, दादागिरी करणारे लोक, सुगी, खेड्यातील सण–उत्सव, प्रेमप्रकरणे, भानगडी, शेतातील नाटयपूर्ण प्रसंग इ. आपल्या कथेत विषय केलेले आहेत. त्यांनी विषयात विपुलता विविधता भरपूर प्रमाणात आणलेली आहे. त्यांनी ग्रामीण कथेचा विस्तार आवाक्यात आणला. ग्रामीण जीवनाभोवती त्यांनी एक प्रदक्षिणा पूर्ण केली. ठोकळांच्या लेखनामुळे ग्रामीण कथा ही जोमाने निर्माण झाली. 'ग्रामीण कथा' हा शब्द याच काळात रुढ झाला. याचवेळी फडकेही कथालेखन करत होते. परंतु ठोकळांनी कथेला फडके यांच्या समांतर असताना पालटवून दाखविले. ही कथा घटनाप्रधान करुन तितकीच मनोरंजक केली.

ग. ल. ठोकळांचे स्वत:चे असे कथा लिहिण्याचे तंत्र आहे. त्यांना कथेमधील वास्तव महत्वाचे वाटत नाही.व्यक्तिच्या स्वभावात सुसंगती ठेवून व्यक्तिच्या मनाचा शोध घेण्यापेक्षा व्यक्तिव्दारा नाट्यपूर्ण घटना घडविणे महत्वाचे वाटते. नाट्यपुर्ण घटनांची मालिकाच त्यांच्या कथामधून ओसंडते, त्यात कधी कल्पनारंजनात्मकता असते. ते स्वभावाने पापुद्रे दाखवत नाहीत. तर ठोस स्वभाव दाखविण्याकडे त्यांचा कल दिसून येतो. आकर्षक आरंभ घटनांची मन रमवून टाकणारी मालिका, तसाच चटकदार शेवट असा त्यांच्या कथेचा आदी आणि अंत असल्याचे

दिसून येते. ठोकळांना वास्तवतेपेक्षा अद्भूतता, व्यक्तिपेक्षा घटना, अर्थपूर्णतेपेक्षा कल्पनाजन्य काव्यमयता, नाटयपूर्णता यांचे आर्कषण फार असल्याचे दिसते. त्यामुळे ठोकळांची कथा ग्रामीण वास्तवापासून, ग्रामीण जीवन दर्शना पासून बाजूला सरकते. ती वाचकांच्या मनाची पकड घेत घेत अधिक—अधिक मनोरंजक होत पुढे—पुढे जाते.

श्री. म. माटे यांच्या कथेत मोठा कस असल्याचे दिसून येते. जीवनाची कुवत पाहण्याची कला माटे यांच्याकडे असल्याचे दिसून येते. म्हणूनच त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व गेले अन्यता ते ठोकळाकडे आले असते. दोघानींही एकाचवेळी एकाच काळात आरंभी लेखन केले आहे. 'ग्रामीण कथा' म्हणून माटे यांच्या कथेचा कस मोठा वाटून आपोआपच त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व गेले आणि ठोकळाकडे फडकेपण आले.

याच कालाखंडात लेखन करणाऱ्या र. वा. दिवे आणि ठोकळ यांचे यशापयश जवळजवळ सारखेच वाटते. त्यांनी कोकणच्या पाशर्वभूमीवर कथा लेखन केले. ते काव्यमय भाषा वापरतात. वर्णन करताना तपशिलवार करतात. खेडेगावातील प्रश्न त्यांनी हाताळलेले आहेत. ते आपल्या कथामधून सुधारणावादी दिशाही दाखवतात. दिघे यांनी जीवनाच्या मुळाशी जावून शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे असे जाणवत नाही. प्रवृत्तीने जे बऱ्याच प्रमाणात ग. ल. ठोकळांना जवळचे वाटतात.

तसेच या कालखंडामध्ये वामन चोरघडे, दत्त रघुनाथ कवठेकर हे पांढरपेशा जीवनासंबंधीच्या कथा लिहितात. ते ग्रामीण कथाकार म्हणून प्रसिद्ध नाहीत. चोरघड्यांनी कथा दिवाकर कृष्णाशी नाते सांगते. उत्कट, तरल, सूचक भावनाविष्कार त्यांच्या कथातून प्रभावीपणे प्रत्ययाला येतो. ती मानवी मनाचे पापुद्रे उकलते. चिंतनशिलतेमुळे ती वजनदार झाली आहे. त्यांच्या कथेमध्ये भाषेची संयत सूचक घडण, भावनेची काव्यमय पातळी जीवनातील अबोल दुःखे

कारुण्य, स्त्रियांच्या मनाचा घेतला जाणारा वेध इ. वैशिष्ट्ये दिसून येतात. 'गोरी बायको', 'भाकरी', 'हरिण', 'अतिथीदेवोभव', 'क्रव्याद', 'ज्योतिर्मयी' इ. कथातून ही वैशिष्ट्ये प्रत्यायाला येतात व ती जाणवतात. 'कलावंताच्या व्यक्तिमत्वाचा जो अविष्कार' म्हणतो तो त्यांच्या कथेत प्रत्ययास येतो.

वामन चोरघड्यांची कथा अंतर्मुख होऊन जीवनमुल्यांचा भावनात्मक पातळीवर शोध घेताना दिसते. मांगल्य, उदात्तता यांकडे त्यांची वाटचाल होताना सदैव दिसते. एक गोष्ट मात्र करावी लागते ती म्हणजे 'ग्रामीण कथा' म्हणून ती फार मोठा ठसा उमटवू शकली नाही. ही तीची मर्यादा आहे.

नंतरचे श्री कवठेकर हे व य. गो. जोशी हे कौटुंबिक वळणाचे कथाकार वाटतात. कौटुंबिक भावना, संबंध यात त्यांची कथा रमताना दिसते. अशा प्रकारे अनेकांची ग्रामीण कथा लिहिल्याचे दिसून येते. एक मात्र निश्चित ग्रामीण कथेची नस फारच थोड्या लोकांना पकडता आली. श्री. कवठेकर यांनीही ग्रामीण कथेकडे केवळ रुचीपालट म्हणूनच पाहिले.

नंतरच्या कालखंडामध्ये मात्र म. भा. भोसले यांनी ग्रामीण जीवनावर निष्ठा ठेवून ग्रामीण कथा सातत्याने लिहिल्या आहेत. यांची कथा ग्रामीण जीवनाशी प्रामाणिक असूनही कुठेही जोर घेत नाही. त्यामुळे निष्ठेने लिहूनही ते बाजूला पडल्यासारखे वाटतात. त्यांच्या कथेमागची प्रेरणा केवळ ग्रामीण रेखाटन करण्याची आहे. पण एवढ्याने साहित्य निर्माण होत नाही. त्याला प्रतिभेचा स्पर्श आवश्यक असतो. भोसल्यांचे तसे क्वचीत होते.

१९४५ च्या आसपास अशा रीतीने ग्रामीण कथा अनेक वेगवेगळया प्रेरणांनी लिहिली जात होती. पण त्यानंतर नव्या वाङ्मयीन दृष्टीची चाहूल लागली. गाडगीळ, गोखले, भावे हे नव्या दमाचे कथालेखक पुढे आले. ग्रामीण विश्वातून व्यंकटेश माडगुळकर त्यांना येऊन मिळाले ते ग्रामीण व्यक्तिचित्रे लिहू लागले. त्यांनी ग्रामीण कथेला नवे बाळसे आणण्याचा प्रयत्न केला.

माडगुळकरांनी अनुभवविश्व वेगळे व्यक्त केले असले तरी, आजपर्यंत लिहिल्या गेलेल्या ग्रामीण कथेपेक्षा त्यांचे अनुभवविश्व वेगळे नाही. त्यांनी जरी माणदेश चित्रित केलेला असला तरी सुखठणकर, सरदेसाई, ठोकळ, दिघे, माटे, चोरघडे यांचे साहित्य वाचल्यानंतर हे लक्षात येते.

आनंद यादव म्हणतात –

" माडगुळकरांनी माणदेशाच्या दुष्काळी मातीत जगणारी, धडपडणारी दरिद्री, धाडसी, वेडी–विद्री, सहनशील अशी नानाविध प्रकारची माणसे त्यांनी पाहिलेली आहेत. या माणसांच्या स्वभावातून निर्माण होणाऱ्या घटना, गंमती त्यांनी आपल्या कथेतून रेखाटलेल्या आहेत. गावातील हेवेदावे चुरस, भानगडी, वेगवेगळे संबंध हे सर्व त्यांनी आपल्या कथातून चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे." १२

माडगुळकरांचा अनुभव विस्तार व्यापक असल्याचे दिसून येते. आजपर्यंत माडगुळकरांच्या बरोबरचे लेखन करणारे कोणी नव्हते.

आनंद यादव म्हणतात – "आजपर्यंतची कमी अधिक फरकाने विस्तारत गेलेली ग्रामीण कथा माडगुळकरांनी विकसीत केली तिला वेगळे वळण दिले त्यामुळे तेज चढले." १३

गाडगीळ, गोखले, भावे, यांच्याबरोबर माडगुळकरही ज्यावेळी लिहू लागले त्याचवेळी भारताला स्वातंत्र्यांची देणगी लाभली होती. माडगुळकरांची ग्रामीण कथा अल्पकाळातच वाचकांचे लक्ष वेधून घेऊ लागली. ही कथा नव उन्मेषाने पुढे येऊ लागली. तिला वेगळीच लोकप्रियता लाभली.

माडगूळकरांच्या नंतर लगेचच नव्या दमाचे व वेगळ्या ताकदीचे ग्रामीण कथाकार पुढे आले. आपले सर्व लक्ष त्यांनी कथेवर केंद्रित केले. माडगूळकरांनी नव्याने त्या–त्या स्वरुपात आणि यथार्थपणे ग्रामीण जीवनदर्शन घडविले आणि याच पार्श्वभूमीवर शंकर पाटील यांची कथा उठून दिसू लागली. माडगूळकर नाही म्हटले तरी माणसे व त्यांच्याभोवतीची परिस्थिती यांचे परस्पर संबंध दाखवितात. त्यामुळे त्यांच्या कथेत भोवतालची परिस्थिती हे संघर्ष केंद्र बनले. त्यांच्या कथेबाबत,

गंगाधर गाडगीळ म्हणतात – "माडगूळकरांची कथा सरळ सोपी वाटते." १४

शंकर पाटीलांनी मात्र मानवी मनात बुडी मारली. नुसते मानवी मनाचे दर्शन घडविण्यापेक्षा त्यांनी मानवी मनाची गुंतागुंत, त्यांची आंदोलने, मनाचे अनेक पापुद्रे हे चित्रित करत गेल्यामुळे अधिक कथा सखोल बनत गेली.

शंकर पाटलांच्या 'आभाळ', 'वेणा', 'पात', 'सारवण', 'भार' इ. कथा त्या दृष्टीने अभ्यासनीय आहेत. त्यांच्या प्रारंभीच्या कथा सोडल्या तर त्यांनी निसर्गाचा व त्यांच्या एकूण स्वरुपाच्या, कथेच्या रुपाशी अत्यंत प्रभावीपणे एकजीव करुन घेतलेला आहे. माडगूळकरापेक्षा पाटलांच्या घाटाची जाणीव अधिक तीव्र वाटतें. 'भुजंग' व 'सारवण' या कथा त्या दृष्टीने महत्वपूर्ण आहेत. त्यांची 'कुस्ती' ही कथा सांकेतिक पद्धतीने कुस्तीचा निकाल न लावता केवळ कुस्तीचे वातावरण हाच विषय घेते आणि वातावरणाचा मनावर विसंबून तिथेच संपते. पाटलांची निवेदन शैली एकदम पात्रांच्या अंतर्मनात शिरुन अविष्कारु लागते. हळूच बाहेर पडून परत निवेदनावर येते. पांटलांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी खेड्यातील मने अधिक व्यक्त केली. पाटलांनी कलात्मक जाणीव तीव्र करुन ग्रामीण कथा अधिक समृद्ध केली. कलेच्या दिशेने तिला वेगळ्या वाटा दाखविल्या. वेगळया शक्यता निर्माण केल्या.

नंतरच्या कालखंडामध्ये लेखन केलेल्या द. मा. मिरासदारांनी ग्रामीण कथेला एक वेगळीच दिशा दाखविली. त्यांची कथा वाचताना सोपी वाटते. परंतु पुढे ती तितकीच अवघड होत जाते. पाटील, माडगुळकरांनी मिश्किलपणा व्यक्त करत ग्रामीण कथा लिहिली असली तरी शुद्ध ग्रामीण विनोदी कथा द. मा. मिरासदारांनी लिहिली. मराठी साहित्यात अनेक व्यक्तिचित्रे ललीतलेख टीकात्मक, लेख, नाटके इ. प्रकार विनोदाच्या प्रेरणेने हाताळले, पण सतत विनोदी कथा यशस्वीपणे लिहिणारे द. मा. मिरासदार हेच पहिले लेखक आहेत. मुळात विनोदी लेखापेक्षा विनोदी कथा हा प्रकार थोडा अवघडच. कारण कथेतील व्यक्ती, प्रसंग, घटना कथानक मुळात काही वस्तुनिष्ठेतेच्या मर्यादा निर्माण करतात आणि त्या मर्यादातच विनोद निर्माण करणे अटळ होऊन बसते. तरीही मिरासदारांनी ग्रामीण विनोदी कथा यशस्वीपणे लिहिली.

आनंद यादव म्हणतात –

" मिरासदारांचा विनोद शब्दनिष्ठ कोटीक्रम इ. तात्कालिक बाबीवर आधारलेला नसतो. तो सरळ स्वभाव, व्यक्ती प्रसंग यांच्यावर आधारलेला असतो. जीवनातील विसंगतीवर त्यांनी बोट ठेवलेले आहे. केवळ विनोदाच्या प्रेरणेनेच मिरासदारांनी ग्रामीण कथा लिहिली. " [१५]

मिरासदारांनी कथा वाचल्यानंतर एक लक्षात येते की, विनोदी विषयामुळे त्यांच्या निवडीवर मर्यादा पडल्या आहेत. एखादा गुण जास्त असलेले माणसेच मिरासदारांनी कथेसाठी निवडलेली आहेत. भुते, प्रेते, चोऱ्या, फसवणूक, खटले, गुन्हे साक्षी इ. मुळातच रंजक असलेले विषय मिरासदारांनी निवडले. त्यामुळे त्यांची कथा विनोदी मिश्किल शैलीत अविष्कृत झाली. त्यांच्या कथेतील मुळातला मिश्किीलपणा उघडकीला येतो व विनोदाला पंख फुटतात. त्यांच्या कथेतील निवेदक हा विसंगतीवर बोट ठेवतो. त्यामुळे विनोद निर्मिती होते. मिरासदारांच्या कथेतील अतिशयोक्तीचे पायही वास्तवात मुळ स्वभावात आहेत. म्हणून त्यांच्या कथा या पुन्हा–पुन्हा वाचाव्याशा वाटतात. आज ग्रामीण कथेकडे पाहिले असता असे दिसून येते की,

आनंद यादव म्हणतात –

"ग्रामीण कथेमध्ये माडगूळकर, मिरासदार, पाटील यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसते." [१६]

याच कालखंडामध्ये कोकण, सांगली, सातारा, कोल्हापूर, खानदेश, मराठवाडा, विदर्भ आदी भागातून अनेक ग्रामीण लेखक नव्याने ग्रामीण कथा लिहू लागले. उध्दव ज. शेळके, रणजित देसाई, ग. दि. माडगूळकर, डॉ. सरोजीनी बाबर, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, नामदेव व्हटकर, इमीद दलवाई, बाबा पाटील, मधु मंगेश कर्णिक, द. का. हसबणीस, रा. रं. बोराडे, बा. भ. पाटील, आनंद यादव, महादेव मोरे, बजरंग शेलार, सखा कलाल, चारुता सागर, द. ता. भोसले, व. बा. बोधे इ. कितीतरी नांवे घेता येतील या दृष्टीने ही यादी आणखीन वाढवता येईल.

या पार्श्वभूमीवरील विचार करताना उध्दव ज. शेळके हे त्या दृष्टीने माडगूळकरांच्या मांडीला खेटून बसल्यासारखे वाटतात. माडगूळकरांनी माणदेशी ग्रामीण जीवन तेवढ्याच ताकदीने आपल्या कथातून रेखाटले. अर्थात प्रदेशानुसार माणसा–माणसातही फरक पडतो. संस्कृतीच्या रंगात वेगवेगळया छटा असतात. धंदे काही प्रमाणात वेगळे असतात. शेळके यांनी ग्रामीण जीवनातील असहायता, दैवाधीनता, दारिद्र भोगत राहण्याची मौनी वृत्ती यावर भर दिलेला आहे. त्यांच्या खास प्रादेशिक भाषेने एक वेगळाच गोडवा निर्माण केलेला आहे.

प्रा. एस्. एस्. भोसले म्हणतात –

"उध्दव ज. शेळके हे विदर्भातील माडगूळकर होत." [१७]

नंतरच्या कथाकारामध्ये रणजित देसाई यांचा उदय झाल्याचे दिसून येते. त्यांनी 'रुपमहाल' ते 'कातळ' पर्यंत स्वत:पुरता असा कथाकार म्हणून विकास झाल्याचे दिसते. त्यांची 'रुपमहाल' या कथा संग्रहातील कथा ही 'मृत्युत' शेवट करणारी स्थूल वाटते असे असून सुद्धा नाट्यपुर्णतेकडे तिचे लक्ष असल्याचे दिसते. त्यांच्या 'कणव', 'कातळ' मधील कथा अधिक कलात्मक वाटतात. त्यात अनेक शक्यता दिसतात. त्यांच्या कथेची संथगती सतत प्रयोग न करीत राहण्याची सुख वस्तुवृती असल्यामुळे त्यांच्या कथा लक्ष वेधून घेत नाहीत. 'कातळ' मध्ये त्यांची वेगळीच ताकद दिसून येते. त्याची भाषा तेथे अत्यंत संयत झालेली आहे. रणजित देसाई यांच्या दुर्लक्षामुळे एक चांगला ग्रामीण कथाकार वेगळ्या क्षेत्रात निघून गेल्यासारखे वाटते.

डॉ. सरोजीनी बाबर, ग. दि. माडगुळकर यांच्या कथेमागील प्रेरणा काही वेगळे लिहिण्यापेक्षा आपणास आलेले अनुभव आपआपल्याला विशेष अशा शैलीत मांडतात. इकडेच त्यांचा कल दिसून येतो. माडगुळकरांच्या लेखनात नाटयपूर्णता जीवनातील मांगल्य, पावित्र्य, उदात्तता, परंपरागत कौटुंबिक मुल्यांचा आदरपूर्वक मान हे विशेष जाणवतात. त्यांच्या प्रसन्न शैलीने हे सर्व जिवंतपणे व्यक्त होते. सरोजीनी बाबर यांचीही विशेष अशी शैली आहे. त्यांच्या कथेला लोकसाहित्याचे काही विशेष लाभलेले आहेत. सुबोध सरळ निवेदन करीत जाण्याकडे त्यांचा कल आहे. 'झालं गेलं' सांगण्या पलिकडे त्यांचा कल असल्याचे दिसून येते. खेड्यातील स्त्रीमनाने झालेले आकलन यांचे त्यांना विशेष आकर्षण आहे.

यानंतरच्या कालखंडामध्ये शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे यांनी आप – आपल्या जाती–जमाती विषयी लक्षात येण्याइतके लिहिले आहे. ते आपल्या जातीबरोबरच समाजातील इतर उपेक्षित जाती विषयीही लिहितात. त्यांच्या कथेत अनुभवांचा विस्तार विशेष जाणवतो. यांच्या कथेतील पात्रे मुकाटपणे सहन करतात. अन्यायाच्या खाईत शांतपणे उभी राहतात हे जाणवते. याउलट मात्र अण्णाभाऊ साठे यांची पात्रे अन्यायाविरूद्ध चिडून उठतात. ती वैयक्तिक

पातळीवर आडदांडपणे मोडतोड करु पाहतात. खून मारामाऱ्या गुन्हे करतात दरोडे घालतात आणि भावनांच्या भरात असे केल्यावर त्यांची मग भावात्मक, शृंगारात्मक, कौटुंबिक पातळीवर कुचबंना होते. आणि वाचकांनी सहानुभुती मिळवू पाहतात. या दोन्ही लेखकांची शैली वेगवेगळी आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांच्या कथेमध्ये मानवता धर्म विशेष जाणवतो.

हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक हे कोकणचा परिसर रंगविणारे ग्रामीण कथाकार उदयास आले. या कथाकारांनी अत्यंत थोडेपण बहुगुणी लेखन केले आहे. खेड्यापाड्यातील मुस्लीम समाजाच्या भावभावना ते अत्यंत सार्थपणे मांडताना दिसतात. मधु मंगेश कर्णिक हे विस्तारशील वृत्तीचे लेखक वाटतात. त्यांना कलात्मकतेची जाणीव आहे. कथा ओघवत्या व आकर्षक शैलीत ते मांडताना दिसतात.

यानंतरच्या कालखंडामध्ये ग्रामीण जीवन रेखाटण करणारे रा. रँ. बोराडे हे ग्रामीण कथाकार होत. बोराडे यांनी स्वतःचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या आरंभीच्या काळात माडगूळकर पाटील यांच्या कथांचे आकर्षण त्यांना वाटत होते. या दोघांच्या कथेच्या वैशिष्टयाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरवातीस केला.

डॉ. आनंद यादव म्हणतात –

“ बोराडे यांच्या कथेचे एक वैशिष्टय म्हणजे लैंगिक आकर्षण होय. पण त्याकडे ते गंभीरपणे अजून वळलेले दिसत नाहीत. तो केवळ त्यांच्या विनोदांचा विषय होऊन बसतो.” [१८]

एकदंर विचार करता असे दिसते की, आजच्या ग्रामीण कथेत कोकण, विदर्भ, कऱ्हाड, सातारा, कोल्हापूर, माणदेश, सोलापूर, मराठवाडा, इ. परिसर आलेले आहेत. उच्च मराठा शेतकरी – कामकरी, महार–मांग, चांभार, ब्राह्मण–मराठा, मुस्लीम, इ. जातीजमाती आलेल्या आहेत. कौटुंबिक, सामाजिक, नैतिक, लैंगिक जीवनाची आवडनिवड त्यात व्यक्त झालेली आहे. पुन्हा यात वाङ्मयीन परंपरा, संकेत येतात ते वेगळेच, रणजित देसाई, सुखठणकर, सरदेसाई यांना अनुभवाच्या दृष्टीने जवळचे वाटतात. ठोकळांची परंपरा साठे यांच्या तंत्रात दिसते, माड्यांचा दृष्टिकोन खरातांच्यामध्ये उतरलेला दिसतो.

याच पार्श्वभूमीवर आनंद यादव हे १९६३ च्या आसपास लेखन करु लागले. त्यांच्याही अनुभवाचे विश्व या विस्ताराहून वेगळे नाही. त्यांच्या कथेचे वैशिष्टय म्हणजे ते आपली कथा अधिक कलात्मतेने, सखोलतेने, उत्कटतेने आणि तरलतेने मांडण्याचा प्रयत्न करतात. आवश्यक तेथे ग्रामीण भाषेतून कथा अविष्कृत करतात.

व्यंकटेश माडगुळकर हे लेखन करत होते तेव्हापासून ते आजपर्यंत ग्रामीण कथेचा विचार करताना एक गोष्ट जाणवते. ग्रामीण कथेला अनेक प्रदेश—परिसरातील विविधता विपुलता लाभली. त्या दृष्टीने ग्रामीण कथेचे पीक भरपूर येते. सुरवातीच्या कालखंडामध्ये त्या—त्या जमातीमधील केवळ अनुभव व्यक्त करणे यालाच लोकप्रियता व प्राधान्य मिळाल्याचे दिसून येते. हे अनुभव व्यक्त करणे म्हणजे ग्रामीण कथा होय असे समीकरण होऊन राहिले होते. यातून टिकाकारही सुटले नाहीत. 'हे सातारचे, हे माणदेशचे, हे कोल्हापूरचे, हे सोला'पूरचे, हे कोकणचे, हे विदर्भाचे, हे मराठवाड्याचे' ग्रामीण कथा लेखक असेच मानले गेल्याचे त्या—त्या प्रदेशाकडून अनेक ग्रामीण लेखक आपल्या अनुभवाची गाठोडी सोडून ते व्यक्त करु लागले. हे लेखन हीच ग्रामीण कथा असल्याचे दिसते. असा सर्व लेखकांच्या प्रामाणिक समज झाला, नाविन्याच्या आमिषामुळे ग्रामीण कथेला भरपूर पीक आले. तशातच हा ग्रामीण साहित्यप्रकार वास्तवतेशी निगडीत आहे. त्यामुळे आलेले अनुभव म्हणजे कथेतील वास्तवता असे समीकरण होऊन बसले. दुसऱ्या बाजूंनी माडगुळकर—पाटील इ. लेखकांनी आरंभापासूनच ही कथा कलात्मक जाणीवेने निर्माण केली. कलात्मतेकडे वाटचाल करायला तिला तूर्त वाव मिळाला नाही. म्हणजेच ग्रामीण कथेच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते की, अनुभवाच्या आणि कलात्मतेच्या दृष्टीने तिची कोंडी झाल्याचे दिसते.

या पार्श्वभूमीवर विचार करताना सगळेच ग्रामीण कथाकार कोंडीत सापडले आहेत की काय? असे वाटावयास लागते. असे कोंडीत सापडल्यानंतर वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची गौण वैशिष्ट्ये राखून कथा कोंडीतच लिहिणे किंवा कथा लिहिणे बंद करणे हे दोन पर्याय लेखकाकडे उरतात. सामर्थ्य असेल तर कोंडी फोडून बाहेर येणे आवश्यक वाटते.

म्हणूनच की काय असे दिसून येते की, माडगूळकर, पाटील, मिरासदार यांनी कथा लेखन जवळजवळ बंद केल्यासारखे वाटते. पाटील सोडले तर माडगूळकर, मिरासदार यांचे लेखन कोंडीत सापडलेलेच दिसून येते. शेळके, खरात आदी मंडळी अनुभवाचे क्षेत्र बदलून दुसरे अनुभव त्याच पद्धतीने जमा करताना दिसतात. बोरांडेचा मात्र स्वत:चा विकास होत असला तरी त्यांची एकूण कथा ही या कोंडीच्या बाहेर नाही. बाबुराव बागूल, चारुता सागर ही दोन नांवे ग्रामीण कथेत येऊन सामील होत आहेत.

एकूणच ग्रामीण कथा अशा वेगवेगळया पातळयावरुन चित्रित होताना दिसते. तिच्यात कधी साचलेपणा आलेला आहे तर कधी कोंडीत सापडली आहे तर कधी प्रादेशिकतेची वैशिष्ट्ये तिला लाभलेली आहेत. म्हणजेच ग्रामीण कथा ही वेगवेगळया साज शृंगार घेऊन चित्रित होताना दिसते.पाटील, बोराडे, मिरासदार यांची कथा तितकीच वैशिष्ट्यपूर्ण असली तरी ही, कथा कुठेतरी कोंडीत सापडल्याचे दिसते. तरीही त्यांची कथा श्रेष्ठ आहे. कारण त्यांच्या कथातून त्यांच्या अशा अनुभव क्षेत्रातील अनुभव सरळ धोपटपणे येऊन जमा होत आहेत. त्यांच्या ह्या अनुभवात नाविन्य, अनोळखीपणा असला तरी ते अनूभव वास्तवतेच्या पातळीवर असतात. त्याला धड कथापणही लाभलेले नसते. वेगळ्या पातळीची, वेगळया वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची वेगळया कलात्मक ताकदीची आज तरी ग्रामीण कथेला आवश्यकता आहे.

ग्रामीण कथेच्या या शेवटच्या टप्प्यावरुन मागे वळून पाहिले तर आरंभिच्या म्हणजे १९४०—४५ च्या आसपासपर्यंत पाहिले तर निर्दोष स्वरुपांची ग्रामीण कथा पहायला मिळत नाही. तिची अभिव्यक्ती नियंत्रीत केलेली दिसते. तिला वाङ्मयीन दर्जा नाही. असे असले तरी सुरवातीची कथा म्हणून तिच्याकडे वळावेच लागते. १८९७ मध्ये दुष्काळ पडला आणि त्यात शेतकऱ्यांचे हाल झाले त्याचे पडसाद हरिभाऊंच्या वाचनात आले आणि तेच कारण त्यांना ही कथा लिहायला पुरेसे झाले.

एखादा वाङ्मय प्रकार जेव्हा नव्याने जन्माला येतो. तेव्हा अंतर्गत असे काहीतरी तात्काळीक कारण घडावे लागते. मग ते वाङ्मयीन अगर कोणत्याही स्वरुपाचे असते. पहिली लेखनकृती सर्व वैशिष्टयांनी निर्दोष असली तरी पुढच्या कथांना ती वाट मोकळी करुन देते. हरिभाऊंची कथा त्या दृष्टिकोणातून महत्वाची आहे.

पुढील कालखंडात लिहिलेल्या सरदेसाई, सुखठणकर यांच्याही कथा प्रादेशिक ग्रामीण याच प्रेरणांनी प्रेरित झाल्याचे दिसते. त्या कालखंडातील आशय नियंत्रीत असला तरी प्राथमिक अवस्थेत तरी त्याची ओळख झाली. ग्रामीण विश्व काय आहे याची जाणीव मराठी लेखकांना या साहित्याने करुन दिली. हे नाकारुन चालणार नाही. सुखठणकर सरदेसाई यांच्या अनुभवाचे केंद्र याला कारण म्हणजे, त्यांच्या अनुभवांची कालिक अपरिहार्यता हे नसून, जुन्या संस्कृतीचा अभिमान, जुन्या मुल्यांचे दिव्यत्व, जुन्या निष्ठातील आजचा हरवलेपणा इ. कारणे आहेत.

'पुर्णदिव्य' निदर्शनास आणून अपेक्षित विचारांना परिणाम साधणे या धोरणामुळे तो भूतकाळ आलेला आहे. आजच्या ग्रामीण कथेतून येणारा त्या–त्या लेखकांचा भूतकाळ हा अनुभवाच्या कालिक अपरिहार्यतेतून आलेला आहे. भूतकाळातील दिव्यता, भव्यता, निष्ठा, संस्कृती इ. गोष्टीतसुखठणकर सरदेसाई यांची कथा संपतें. तिच्यातील पात्रे, प्रसंग, शेवट, निवेदने त्याच हेतूने केलेली दिसतात. ग्रामीण कथेच्या दृष्टीने हा काळ आरंभीचाच होता. आरंभीच्या कालावधीमध्ये कोणतेही वास्तववादी वाङ्मय आशयाकडे झुकते. या काळात या मागणीपासून कोणताही साहित्यिक अलिप्त राहिलेला दिसत नाही. कलावंत हा मुळातच अधिक संवेदनशील व उत्कट जगू पाहणारा प्राणी आणि त्या काळात प्रत्येकजण स्वातंत्र्य – सुधारणा यांच्या ध्यासाने प्रभावित झाला होता. त्या काळातील वाङ्मयातील ग्रामीण जीवन हे आज ठोकळेबाज स्थूल वाटते.

ठोकळे, दिघे यांनी वाचकांचे मनोरंजन मानले, त्यासाठी त्यांनी आपआपले तंत्रे वापरली. निसर्गवर्णने लिहिली. वाक्याच्या फेकी आणि लकबी यावर भर दिला. स्वभावांशी सुसंगत वागण्यापेक्षा अद्भूत, काव्यमय घटना निर्माण करायला सुरवात केली की, आजपर्यंतची ग्रामीण कथा ही पांढरपेशांनी पांढरपेशासाठी निर्माण केलेली होती.

त्याच कालखंडात श्री. म. माटे यांनी लिहिलेली कथा मात्र पांढरपेशे असून लिहिली असली तरी आणि ती पांढरपेशासाठी असली तरी ती ग्रामीण कथा होती. कारण त्यांनी हरिभाऊंची वाङ्मयीन दृष्टी आचरली. म्हणून त्यांचे लेखन आशय संपन्न झाले. मूळात अनुभवेला आशय त्यांनी कथेत मांडला. माट्यांचे विश्व लहान होते, तरी ते अत्यंत कसदार आणि सखोल, मानवतेच्या स्पंदनाने जिवंत झालेले होते. म्हणून ग्रामीण कथेचे जनकत्व मार्ट्याकडे जाते. पुढे हेच काम व्यंकटेश माडगुळकरांनी मन:पूर्वकतेने, व्यापकतेने, सुक्ष्मतेने सातत्याने केले.

याच काळातील ग्रामीण कथेतील आरंभिची पात्रे काहीशी अतिरंजित, स्थूल, ओबडधोबडपणे घडलेली वाटतात, लेखकांनी त्यांच्या मनावर भर देण्यापेक्षा त्यांच्या शरीरावर, त्यांच्या हालचालीवर, त्यांच्या चालण्यावर, त्याच्या बाह्यकृतीवरच अधिक भर दिलेला दिसतो. पात्रेही वाजवीपेक्षा जास्त बोलताना दिसतात. पण प्रत्यक्षातील वास्तव आणि कथेतील वास्तव यात मोठा फरक आहे. हे फार थोड्यांच्या ध्यानी आले. हे ध्यानी येणे फार महत्वाचे आहे.

याच कालखंडात कथेमध्ये मोठ्या प्रमाणावर किस्से जास्त पिकल्याचे दिसतात. कथेंना कलाटण्या सारख्या मिळू लागल्या. शिव्यामधून पात्रे जास्त रंगू लागली. त्यामुळे ग्रामीणकथा सरळमार्गी, धोपट पद्धतीचीच होती.

पण हे लेखन माडगूळकर–पाटील यांच्याबरोबरच संपुष्टात आले. त्यांची कथा नंतर मन:पुर्वक झाली. कथेतून निसर्ग येवू लागला. संवादातील खटके, पैसपणा, रंगत जाऊन कथेच्या ओघाशीते एकजीव होऊ लागले. मानवी हालचाली नष्ट होऊन त्यांच्या मानसिक अवस्था प्रकट होऊ लागल्या. माडगूळकर पाटील, रणजित देसाई यांच्या कथा वाचताना हे लक्षात येते.

१९६५ नंतरची ग्रामीण कथा लहान–मोठया मोहातून मुक्त होऊन कलात्मकतेच्या दिशेने अधिक जागरुकतेने वाटचाल करताना दिसते. ती कथा अधिकाधिक अंतर्मुख आणि आत्मनिष्ठ होताना जाणवते. या दृष्टीने आनंद यादव यांची कथा तपासून पाहणे आवश्यक आहे. ग्रामीण कथेमध्ये ग्रामजीवन येते का? बदलत्या आजच्या खेड्यांचे वर्णन येते का हे तितकेसे महत्वाचे नाही. ग्रामीण कथेने मानवी मनाचे अनेक पापुद्रे मनामनाचे संबंध, त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या भावना, संवेदना, विचार आंदोलने मन:दर्शन इ. गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कथेमध्ये लेखकाने सौंदर्य निर्मितीच्या वेळी नागरभाषेचा जरुर वापर करावा, पण एक मात्र निश्चित ग्रामीण कथा ही अधिक मन:पुर्वकतेने निर्माण होणे आवश्यक आहे. त्या कथेतील अनुभवाची

तीव्रता, व्यामिनता, सखोलता वाढणे जरुरीचे आहे. तसेच भूक, दारिद्र्य, अज्ञान, शोषन आणि उपेक्षा यापलिकडे ग्रामीण जीवनात काही अनुभव असतात. काही काव्यात्म व तरल जातीचेही असतात. याची जाणीव लवकर होणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्याची गोड फळे खायला मिळतील अशा भ्रमात असणाऱ्या मंडळींचा भ्रमनिरास झालेला होता. अपेक्षाभंग झालेला होता. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली व तारुण्यात पदार्पण केलेली पिढी बेकार दिशाहिन अवस्थेतच फिरत होती. या उद्रेकाचा स्वर १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्यात उमटू लागला आणि आता १९९०–९२ च्या काळातील ग्रामीण कथेत विद्रोहाचा सूर आळवायला सुरवात केली आहे.

सारांशरुपाने आपणास असे म्हणता येईल की, आपला देश खऱ्या अर्थाने खेड्यांचा देश आहे. कृषाकेंद्रित खेड्यातील माणसांची इतर जनापेक्षा वेगळी असते. शहरातील काही सुखसोयी खेड्यात आल्या की, खेड्यांचे रुपांतर शहरात होते हे म्हणणे सर्वार्थाने खरे नाही. म्हणून या ग्रामीण साहित्याला विशेषत: कथेला अजून नवा बहर येण्याची गरज आहे. व तिला नवे धुमारे फुटावयास हवेत तरच खऱ्या अर्थाने अजूनही ग्रामीण कथा जिवंत आहे असे वाटावयास लागेल.

♦

अशी जिवंत कथा लिहिणारे एक लेखक आहेत रंगराव बापू पाटील. त्यांच्या अनेक कथांना पारितोषिके मिळाली आहेत. तर दोन कथासंग्रहांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळाली आहेत. त्यांच्या कथांनी मराठी साहित्यात निश्चित मोलाची भर घातली आहे. त्यांच्या 'ल्हावर' व 'भोवरा' या कथा संग्रहाच्या आधारे त्यांच्या सामर्थ्याचा वेध घेण्याचा प्रयत्न या प्रबंधिकेत केला आहे.

## रंगराव बापू पाटील यांचा जीवन परिचय

श्री. रंगराव बापू पाटील यांचा जन्म बहादुरवाडी येथे झाला. त्यांचे गांव कामेरी, ता. वाळवा, जि. सांगली हे आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण दुशेरे या गावात झाले तर माध्यमिक शिक्षण इस्लामपूर येथे झाले. तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूरला राजाराम आणि गोखले कॉलेजमध्ये झाले. ते पुणे विद्यामीठाचे बी.ए. आहेत. तसेच ते बी.एड्. 'पुतळाबेन शहा कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली' येथे झाले. ते एम्.ए. बी. एड्. आहेत.

त्यांना माध्यमिक शाळेत नोकरी होती. ते नोकरीला कासेगांव एज्युकेशन सोसायटीच्या 'यशवंत हायस्कूल, इस्लामपूर' येथे होते. तसेच त्यांनी साखराळे, कापूसखेड येथेही नोकरी केली. कापूसखेडमध्येच नोकरी करत असताना मार्च, १९९७ ला सेवानिवृत्त झाले. त्यांनी वयाची ३० वर्षे नोकरी केली.

रंगराव बापू पाटील यांचे बालपण वडील ज्या गावात प्राथमिक शिक्षक होते त्या दुशेरे गावात गेले. गुरुजींचा मुलगा म्हणून मान होता. त्यांचे बालपण खूप लाडात गेले. घरात सुशिक्षीत वातावरण होते. बालपणीच मनावर चांगले संस्कार झाले. ग्रामीण जीवनाचा मनावर प्रभाव पडला. ज्या घरमालकाच्या घरात ते रहात होते, त्यांचे प्रेम त्यांना मिळाले. वडिलांना वाचण्याचा छंद असल्यामुळे वाचण्याचे वेड लागले. त्यांच्यावर 'तीन मुले', 'शशी', 'श्यामची आई' या पुस्तकांचा प्रभाव पडला. लहानपणी त्यांना चांगले मित्र भेटले.

पाटलांना लहानपणी नाटके बघायला आवडत असे. तसेच त्यांना सभेतील भाषणेही ऐकण्याचा छंद होता. तसेच त्यांना बासरी, बॅंजो, माऊथ ऑर्गन, डफ, पेटी इ. वाद्ये वाजवण्यास आवडत होते.

त्यांनी कथा लिहिण्यास वयाच्या १६ व्या वर्षी सुरवात केली. त्यांना कथा लिहिण्याची आवड साने गुरुजींची कथा वाचून झाली. त्यांची पहिली कथा 'पायवाट' ही आहे. 'स्वराज्य' ह्या साप्ताहिकामध्ये १९६० मध्ये प्रसिद्ध झाली. त्यावेळी ते कॉलेजच्या पहिल्या वर्षाला होते.

त्यांच्या कथालेखनामागची प्रेरणा माडगूळकरांचे कथालेखन आहे. त्यांच्या लेखनावर साने गुरुजी, शंकर पाटील यांच्या लेखनाचा प्रभाव आहे. व्यंकटेश माडगूळकर हे त्यांचे श्रद्धास्थान आहेत.

आतापर्यंत प्रकाशित झालेले त्यांचे साहित्य पुढीलप्रमाणे – त्यामध्ये कादबंऱ्या 'बोरबन', 'दंश', 'उज्ज्वला', 'अपहरण', 'वस्ताद', 'कारस्थान', 'मळ्याची वाट' इ. आहेत. कथासंग्रह 'ल्हावर', 'भोवरा' 'मुराळी', 'झुली', 'रानकोंबडी' इ. आहेत.

साहित्यामधले पहिले बक्षीस 'हिरवी काच' या कथेला मिळाले. 'तरुण भारत' दिवाळी अंकामध्ये ही स्पर्धा होती. नंतर दुसऱ्या वर्षी तरुण अंकामधीलच स्पर्धेमध्ये 'ल्हावर' कथेला बक्षीस मिळाले. नंतर 'गांवकरी' दिवाळी अंकामध्ये 'दुपार' या कथेला पारितोषीक मिळाले. नंतर १९८० साली 'ल्हावर' या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार मिळाला. त्यानंतर १९९३ ला 'भोवरा' कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार मिळाला.

सध्या ते पेपरमधून विशेषत: सकाळमधून त्यांचे लेखन सुरु आहे. 'माझी पायवाट', 'माझे कोल्हापूरचे दिवस', 'चोरांचे दिवस', 'संगत', 'करमणूक', 'शाळा', 'खेळ', 'पारिजातक', 'चाफ्याचा दरवळ', 'डोह', 'रानमेवा' इ. ललीत निबंध प्रकाशित झालेले आहेत.

त्यांचे साहित्यिक मित्र सका कलाल, महादेव मोरे, विलास मोहिते, आप्पासाहेब खोत इ. आहेत.

मुलाखतीमध्ये कथा कशी लिहिता हे विचारल्यानंतर ते म्हणाले आलेला अनुभव हा जसाच्या तसा न मांडता स्वत:चे तंत्र वापरुन, रचना करुन पात्रांची निवड करुन कथा लिहितो. विशेषत: मी धक्का तंत्र वापरतो. असे त्यांनी सांगीतले. इतक्या काव्यात्म पातळीवर कथेला पोहचणाऱ्या या लेखकाबद्दल सहजच माझ्या मनात एक विचार आला की, त्यांनी कविता का लिहिल्या नाहीत. हा प्रश्न मी त्यांना विचारल्यावर ते म्हणाले –

"सुरवातीला मी कविता लिहित होतो. परंतु नंतर कथा वाचनात आल्यामुळे कवितेकडे दुर्लक्ष झाले, कविता जमली नाही. कथेला यश मिळत गेले त्यामुळे कविता लिहिली नाही."

ते विनयाने असे म्हणत असले तरी त्यांच्यातील कवीमनाचा अविष्कार त्यांच्या कथेतच उमटलेला आहे असे दिसते.

असे हे रंगराव बापू पाटील कथाकार आहेत.

# संदर्भ – टीपा


| अ.न. | लेखक | पुस्तक |
|---|---|---|
| १. | पोतदार द. वा. | 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार', व्हीनस प्रकाशन, दुसरी आवृत्ती, डिसेंबर,१९५७, पृष्ठ क्र. १५ |
| २. | निंबाळे शरणकुमार | 'मराठी वाङमयातील नवीन प्रवाह', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि., १५ ऑक्टोंबर, १९९३, पृष्ठ क्र. २४,२५. |
| ३. | निंबाळे शरणकुमार | 'मराठी वाङमयातील नवीन प्रवाह', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि., १५ ऑक्टोंबर, १९९३, पृष्ठ क्र. २८. |
| ४. | निंबाळे शरणकुमार | 'मराठी वाङमयातील नवीन प्रवाह', मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि., १५ ऑक्टोंबर, १९९३, पृष्ठ क्र. ११. |
| ५. | डॉ. यादव आनंद | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. ७६. |
| ६. | डॉ. यादव आनंद | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. ७६. |
| ७. | डॉ. यादव आनंद | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १०. |
| ८. | डॉ. यादव आनंद | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १०,११. |

| | | |
|---|---|---|
| ९. | डॉ. यादव आनंद | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १२. |
| १०. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १४. |
| ११. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १४. |
| १२. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १८. |
| १३. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १८. |
| १४. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. १९. |
| १५. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. २०. |
| १६. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. २०. |
| १७. | एस्. एस्. भोसले | 'वृत्तपत्रातील एक लेख' |
| १८. | डॉ. आनंद यादव | 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, ३०. तृतीयावृत्ती, जुलै, १९९३, पृष्ठ क्र. २३. |